MHAH170037022017

दाखल दिनांक – २१.०९.२०१७
नोंदणी दिनांक – २१.०९.२०१७
निकाल तारीख – १७.०३.२०२६
कालावधी – ०८वर्ष०५महिने२४दिवस

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राहाता येथील न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी श्री. पंकज रा. फुलारी)**

**नि. फौ. ख. क्र.१८६/२०१७**

**निशाणी क्रमांक ३४**

महाराष्ट्र शासन,
तर्फे लोणी पोलीस स्टेशन अधिकारी,
ता. राहाता, जि. अहमदनगर. ..... **अभियोगपक्ष**

**विरुध्द**

विकास उर्फ गोट्या अरुण भालेराव,
वय – १९ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
रा. बाभळेश्वर, ता. राहाता, जि. अहमदनगर.

..... **आरोपी**

**अधिवक्ताः**

**अभियोग पक्षातर्फेः–** सहाय्यक अभियोक्ता ए.एस.महाले.

**आरोपीतर्फेः–** विधीज्ञ ए.बी.पाळंदे

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | १९.०५.२०१७ |
| २. | प्रथम वर्दी अहवाल नोंदविल्याचा दिनांक | १९.०५.२०१७ |
| ३. | दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | १९.०५.२०१७ |
| ४. | दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | ०६.०२.२०१९ |
| ५. | पुरावा सुरु केल्याचा दिनांक | १४.०१.२०२२ |
| ६. | निकालासाठी राखीव ठेवल्याचा दिनांक | --- |

| | | |
|---|---|---|
| | | |
| ७. | निकाल घोषित केल्याचा दिनांक | १७.०३.२०२६ |
| ८. | शिक्षा सुनावली असल्यास आदेश दिनांक | निरंक. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामिनावर मुक्त दिनांक | ठेवण्यात आलेल्या दोषारोपाची कलमे | निर्दोष किंवा शिक्षा | शिक्षेचे वर्णन | कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे कारागृह कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | विकास उर्फ गोट्या अरुण भालेराव | १९.०५.२०१७ | १९.०५.२०१७ | कलम ३७९ भारतीय दंड विधान अन्वये. | निर्दोष | निरंक | निरंक |

## सरकार पक्ष / बचाव पक्ष / न्यायालय तर्फे साक्षीदारांची यादी

**अ. सरकार पक्षः–**

| साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नांव | साक्षीदाराची वर्गवारी | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १ | शिवाजी तबाजी कोळगे | पंच | १३ |
| २ | नामदेव खंडू कणसे | फिर्यादी | २७ |
| ३ | नासिर खान नादीर खान पठाण | साक्षीदार | ३० |
| ४ | ईरफान राजाभाई सय्यद | पंच | ३१ |

**ब. बचाव पक्षाच्या साक्षीदारांची यादीः–** निरंक.

**क. न्यायालयाचे साक्षीदारांची यादीः–** निरंक.

**सरकार पक्ष / बचाव पक्ष/ न्यायालय तर्फे दस्तऐवजांना निशणी देण्यात आलेली यादी**

**अ. सरकार पक्षः–**

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | दस्तऐवज विवरण | दस्तऐवज निशाणी देण्यात आलेले साक्षीदारांचे क्र. |
|---|---|---|---|
| १. | **सहीस १४** | घटनास्थळ पंचनामा | सा.क्र.१ |
| २. | **२८ व २९** | फिर्याद व प्रथमखबरी अहवाल | सा.क्र.२ |
| ३ | **सहीस ३२** | घटनास्थळ पंचनामा | सा.क्र. ४ |

**ब. बचाव पक्षः–** निरंक.

**क. न्यायालयातर्फे निशणीः–** निरंक.

**ड. मुद्देमाल / वस्तुः–** सिगारेटचे ३ पाकीटे र. रु. २७०/–, ब्रिस्टॉल सिगारेटचे ५ पाकीटे र. रु. २२५/–, पान मसाल्याचा एक पुडा र.रु.६०/–, गायछाप जर्दा कंपनीचा एक पुडा र.रु.३६०/– व रोख र.रु. ६१२०/– असे एकुण र.रु.७०३५/–.

## न्यायनिर्णय

(घोषित तारीखः १७/०३/२०२६)

सदरील खटला आरोपीविरुध्द कलम ४६१, ३८० भारतीय दंड विधान अन्वये दाखल करण्यात आला असुन थोडक्यात अभियोग पक्षाचे कथन खालील प्रमाणे आहे.

२. दि. १९.०५.२०१७ रोजी पहाटे ०२.२० वा. सुमारास वॉचमन नासिर शेख यांनी माहिती देणार यांना फोन करुन कळवले की, आमचे गावातील विकास उर्फ गोट्या भालेराव याने तुमची टपरी फोडली आहे व दुकानातील माल पिशवीत घेऊन जात आहे. फोन आल्यानंतर ते ताबडतोब घटनास्थळी गेले असता त्यांच्या टपरीचा पत्रा उचकटलेला होता व टपरीतील सामानाची उचकापाचक केलेली होती. तसेच,

पैशाचा ड्रॉवर उघडलेला होता व तेथे नासिर शेख, त्यांचा मुलगा नईम शेख व सुमित विठ्ठल मोरे यांनी गावातील गोट्या उर्फ विकास अरुण भालेराव यास धरुन ठेवले होते. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांच्या दुकानातील सामानाची चौकशी केली असता गोल्ड फ्लॅक सिगारेटचे ३ पाकिटे, ब्रिस्टॉलचे सिगारेटचे ५ पाकिटे, पान मसाल्याचा एक पुडा, गायछाप जर्दा कंपनीचा एक पुडा व रोख र.रु. ६१२०/– त्यांना दिसुन आली नाही. दरम्यान त्यांनी लोणी पोलीस स्टेशनला चोरीबाबत कळवले व तेव्हा तेथे पोलीस आले व त्यांनी दोन पंचाना बोलावुन आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे चोरीस गेलेला माल व रोख रक्कम असे एकुण रक्कम रु. ७०३५/– चा माल मिळुन आला. त्यानंतर फिर्यादीने पोलीस स्टेशनला घटनेबाबत फिर्याद दिली.

३. माहिती देणार यांच्याकडुन मिळालेल्या माहिती प्रमाणे पोलीसांनी आरोपीविरुध्द गुन्हा क्रमांक ७५/२०१७ कलम ४६१, ३८० भारतीय दंड विधान अन्वये नोंद केला व तपासाअंती आरोपी मिळुन आल्यामुळे प्रस्तुत आरोपीविरुध्द कलम ४६१, ३८० भारतीय दंड विधान अन्वये दोषारोप पत्र दाखल केले.

४. प्रस्तुत प्रकरणात निशाणी क्र. १० वर आरोपीविरुध्द कलम ३७९ भारतीय दंड विधान अन्वये गुन्हा केल्याबाबत दोषारोप निश्चीत केला. आरोपीने त्याच्यावरील दोषारोप मान्य न करता खटला चालविण्याची विनंती केली.

५. आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने चार साक्षीदार तपासले. अभियोगपक्षाचा पुरावा झाल्यानंतर आरोपीचे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे जबाब निशाणी क्र. ३३ वर नोंदविण्यात आले व आरोपीला गुन्ह्याशी संबंध दाखविणारे सर्व परिस्थिती बाबत प्रश्न विचारण्यात आले. आरोपीने बचावामध्ये अभियोगपक्षाची संपुर्ण हकीकत नाकारली आहे.

६. अभियोगपक्षाचे कथानक व आरोपीविरुध्द निश्चित करण्यात आलेला

दोषारोप पाहता माझ्या समोर पुढील विचारार्थ बाबी उपस्थित होतात त्या वरील माझे निष्कर्ष मी पुढील विवेचणासह खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | विचारार्थ बाब | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | आरोपीने दि. १९.०५.२०१७ रोजी पहाटे ०२.२० वा. सुमारास शिवगंगा पानटपरी, ता. राहाता, जि. अहमदनगर येथे माहिती देणार नामदेव यांची पानटपरी फोडुन त्यातील माल व रोख रक्कम त्यांच्या संमतीशिवाय घेऊन कलम ३७९ भारतीय दंड विधाना नुसार गुन्हा केला हे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय ? | ....नकारार्थी |
| २ | आदेश काय? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

### विचारार्थ बाब क्र. १ साठीः–

७. आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने एकुण चार साक्षीदार तपासले. साक्षीदार क्र. १ शिवाजी तबाजी कोळगे यांना नि.क्र. १३ वर, साक्षीदार क्र. २ नामदेव खंडू कणसे यांना नि.क्र. २७ वर, साक्षीदार क्र. ३ नासिर खान नादीर खान पठाण यांना नि.क्र. ३० वर व साक्षीदार क्र. ४ ईरफान राजाभाई सय्यद यांना नि.क्र. ३१ वर तपासले आहे.

८. साक्षीदार क्र. २ नामदेव खंडू कणसे हे प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी असुन त्यांनी त्यांचे साक्षीत ते सन १९८२ पासुन पान टपरीचा व्यवसाय करत असल्याचे व त्यांची पान टपरी बाभळेश्वर चौकात असल्याचे त्यांनी कथन केले आहे. सन २०१७ मध्ये त्यांचे शिवगंगा पान स्टॉल असल्याचे त्यांनी कथन केले आहे. दि.

१९.०५.२०१७ रोजी वॉचमन नासिर शेख यांनी त्यांना रात्री ०२.०० वाजता फोन करुन त्यांची टपरी फोडल्याची माहिती दिली असल्याचे त्यांनी कथन केले आहे. फोन आल्यानंतर त्यांनी पान टपरी जाऊन पाहिली असता त्यांना टपरी फोडल्याचे व टपरीतील सामान चोरी झाल्याचे दिसल्याचे त्यांनी कथन केले आहे. त्यावेळी घटनास्थळी पोलीसांची गाडी आली व पोलीसांनी त्यांना पोलीस स्टेशनला नेले व तेथे त्यांनी तक्रार नोंदवली. त्यांनी नि.क्र. २८ व २९ वरील फिर्याद व प्रथमखबरी अहवाल सिध्द केला आहे. सदर चोरीमध्ये त्यांच्या दुकानातील बीडी, सिगरेटचे पाकिटे व इतर दुकानातील इतर माल अंदाजे रक्कम रुपये १,५००/– व रोख रक्कम रुपये ५,०००/– चोरीला गेल्याचे त्यांनी कथन केले आहे. आरोपीने पोलीस स्टेशनला चोरीला गेलेला माल जमा केल्याचे त्यांनी कथन केले आहे.

उलटतपासादरम्यान फिर्यादीने ते घटनेच्या वेळी घटनास्थळी हजर नव्हते व त्यांनी आरोपीला प्रत्यक्ष चोरी करताना पाहिले नसल्याचे मान्य केले आहे.

साक्षीदार क्र. ३ नासिर खान नादीर खान पठाण हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुन सदर साक्षीदाराने त्यांना घटनेबाबत काहीही माहित नसल्याचे कथन करुन अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही.

९. प्रस्तुत प्रकरणात साक्षीदार क्र. १ व ४ हे घटनास्थळ पंचनाम्यावरील साक्षीदार असुन त्यांनी अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही व त्यांना पंचनाम्यातील मजकुराबाबत काहीही माहिती नसल्याचे त्यांनी कथन केलेले आहे.

अभियोगपक्षाचे वतीने सहा. सरकारी विधीज्ञांनी उलटतपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारुन अभियोगपक्षाचे कथन अभिलेखावर सिध्द करण्याचा प्रयत्न केला आहे परंतु साक्षीदाराने सर्व उत्तरसुचक प्रश्नाला नकारार्थी उत्तरे दिले आहेत. प्रस्तुत प्रकरणात माहितीदेणार यांचे चोरी गेलेले सामान व रोख रक्कम आरोपीचे ताब्यातुन जप्त झाले ही बाब सिध्द होणे अत्यंत आवश्यक असुन साक्षीदारांनी सहकार्य न केल्यामुळे आरोपीचे ताब्यातुन झालेली जप्ती सिध्द होऊ शकलेली नाही.

१०. एकंदरीत पंच साक्षीदार व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता घटनेच्या दिवशी आरोपीने माहिती देणार यांचे संमतीशिवाय त्यांचे टपरीतील सामान व रोख रक्कम चोरुन नेले ही बाब संशयापलीकडे जाऊन सिध्द होत नाही. अशापरिस्थितीत आरोपीविरुध्द सबळ पुरावा अभिलेखावर उपलब्ध नसल्यामुळे आरोपी यांनी घटनास्थळावरुन पान टपरीतील सामान व रोख रक्कम चोरी केले या निष्कर्षाप्रत जाणेइतपत परिस्थितीजन्य पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही अशा परिस्थितीत आरोपीने कलम ३७९ भारतीय दंड विधान अन्वये गुन्हा केला हे सिध्द होऊ शकले नाही, त्यामुळे मी विचारार्थ बाब क्रमांक १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**विचारार्थ बाब क्र. २ साठीः–**

११. अभियोगपक्ष आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द न करु शकल्यामुळे आरोपी निर्दोष होण्यास पात्र आहे. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल माहिती देणार नामदेव खंडू कणसे यांनी त्यांचे मालकीचा असल्याचे कथन केले आहे व आरोपीने त्यासंबंधात कुठलीही मागणी केलेली नाही अशापरिस्थितीत जप्त मुद्देमाल माहिती देणार यांना देणे न्याय आहे. एकंदरीत सर्व परिस्थितीचा विचार करता मी विचारार्थ बाब क्र. २ चे अनुषंगाने खालील प्रमाणे अंतीम आदेश पारित करित आहे..

**आदेश**

| | |
|---|---|
| १ | **आरोपी विकास उर्फ गोट्या अरुण भालेराव** यांची कलम २४८(१) फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये, कलम ३७९ भारतीय दंड विधान अन्वये गुन्ह्याचे आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २ | आरोपीने कलम ४३७ (अ) फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे रक्कम रु.१५,०००/– वैयक्तीक बंधपत्र व जामीन सादर करावा. |
| ३ | गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल रक्कम रु. ६१२०/– माहिती देणार नामदेव |

| | |
|---|---|
| | खंडू कणसे, वय– ४३ वर्षे, रा. तिसगाववाडी, ता. राहाता, जि. अहमदनगर यांना परत करण्यात यावे. गुन्ह्यातील इतर जप्त मुद्देमाल सिगारेटची ८ पॉकिटे, पान मसाला पुडा व गायछाप जर्दा तंबाखु पुडा हे साधारणतः नऊ वर्षापुर्वी जप्त केल्याची बाब विचारात घेता अन्न सुरक्षा अधिकारी यांचे निगराणीखाली नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा. |
| (न्यायनिर्णय खुल्या न्यायपिठात घोषित). | |

PANKAJ RAMDAS PHULARI
Digitally signed by PANKAJ RAMDAS PHULARI
Date: 2026.03.17 16:42:46 +0530

ठिकाण – राहाता. **(पंकज रा. फुलारी)**

दिनांक – १७.०३.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राहाता.

## <u>दाखला</u>

दाखला देण्यात येतो की, पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णय / आदेशा प्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | एस.एस. करंडे<br>लघुलेखक (श्रेणी–३), |
| न्यायालयाचे नांव | | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राहाता, |
| आदेश जाहीर केल्याचा तारीख | – | १७.०३.२०२६ |
| आदेशावर न्यायाधीशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | – | १७.०३.२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | – | १७.०३.२०२६ |